# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 417/2022 दिनांक : 31.10.2022

## 1)घरफोडी :–

**1)वजीराबाद :–** दिनांक 30.10.2022 रोजी 02.06 ते 02.30 वा. चे दरम्यान, **सन्मान प्रेस्टीज वजिराबाद नांदेड येथे,** यातील फिर्यादीस त्यांचे मालकाने ऑफिस लेबर पेमेंट व बिल्डींग मटेरीयल साहीत्याची रक्कम वाटप करण्यासाठी 22,15,470/–रूपये रक्कम कॅशीयर जवळ दिले होते. व कॅशीअरने सदर रक्कम टेबलचे ड्रॉव्हर मध्ये ठेवली असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी संडास बाथरूमची खिडकी तोडुन आत मध्ये प्रवेश करून ड्रॉव्हर मध्ये ठेवलेली रक्कम चोरून नेली आहे. वगैरे **फिर्यादी नंदकुमार जळबाजी गाजुलवार, वय 50 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी सन्मान कंन्सट्रक्शन रा. चौफाळा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 377/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री निलपत्रेवार, मो.क्रं. 9881201052** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 29.10.2022 रोजी रात्री 10.00 ते दि. 30.10.2022 चे 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी गोपाळचावडी कमानीसमोर उस्माननगर रोड वाघाळा ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याची पत्नी झोपलेल्या बाजुच्या बेडरूमचा दरवाजाचे कोणीतरी अज्ञात चोरटयांनी कुलूप तोडुन आत प्रवेश करून कपाटाचे लॉकरमये देवीचे मंदीर बांधण्यासाठी पांढऱ्या दस्तीत बांधुन ठेवलेले नगदी दोन लाख रूपये व सोन्या चांदीचे दागीने असा एकुण 3,06,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी रोशनसिंह चरणसिंही विदेह ठाकुर, वय 47 वर्षे, व्यवसाय शिक्षक रा. गोपाळचावडी कमानीसमोर उस्माननगर रोड वाघाळा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 645/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री थोरात, मो.क्रं. 9823298315** हे करीत आहेत.

**3)विमानतळ :–** दिनांक 23.10.2022 रोजी 11.00 ते दि. 29.10.2022 चे 20.00 वा. चे दरम्यान, **नाईकनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे दिवाळी सणा निमित्त गावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहाते घराचे मुख्य दरवाजाचे लॉक तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे लॉकेट एक तोळा वजनाचे किमती 30,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी डॉ. विवेक पि. शंकरराव कुलकर्णी, वय 48 वर्षे, व्यवसाय वैद्यकीय सेवा रा. नाईकनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 373/2022 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/591 नागरगोजे, मो.क्रं. 8412879395** हे करीत आहेत.

## 2)सायकल चोरी :–

**1)भाग्यनगर :–**दिनांक 30.10.2022 रोजी चे 12.00 ते 18.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी वाडी बु. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे त्यांचे साडुचे दुकानाचे उद्घाटणसाठी गेले असता त्यांचे मुलीची गँग कंपणची सायकल किंमती 8,000/–रूपयाची कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे. वगैरे **फिर्यादी केतनकुमार उत्तम तेलगावकर, वय 39 वर्षे, व्यवसाय नौकरी (दिवानी न्यायाधिश वरिष्ठस्तर बीड) ह. मु. वाडी बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 394/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/926 आर जे कळणे मो.क्र. 9923027926** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)इतवारा :–** दिनांक 04.07.2022 ते 23.08.2022 चे दरम्यान, **भोरीगाव रोड तिरूपतीनगर, वसमत जि. हिंगोली ह. मु. संघसेननगर इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन मो सा घेण्यासाठी एक लाख रूपये आन म्हणुन मारहाण व शिवीगाळ करून शारिरिक व मानसिक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 297/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे मॅडम, मो.क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** एप्रिल 2020 पासुन ते नोव्हेंबर 2021 दरम्यान, **फिर्यादीचे नांदते घरी मौ. सावरगाव पीर ता. मुखेड ह. मु. बागन टाकळी ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस हॉटेल टाकण्यासाठी तुझे माहेरहुन एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन मारहाण व शिवीगाळ करून शारिरिक व मानसिक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 498/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2462 केंद्रे, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 28.10.2022 रोजी सायंकाळी 05.00 वा. चे सुमारास, **वाजेगाव ते मुदखेड जाणारे रोडने बायपास रोडकडे इंडियन सिमेंट कंपणी वाजेगाव समोर रोडवर ता. जि. नांदेड येथे,** यातील मयत नामे **गंगाधर विठठल येडके, वय 20 वर्षे, रा. खडक मांजरी ता. लोहा जि. नांदेड ह. मु. महेबुबशेट यांचे विटभटटीवर वाजेगाव ता. जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील टाटा 407 टेम्पो क्रं एमएच–26/व्हीटी–0771 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयताची मो.सा. क्र. एमएच–26/एऋ–0070 हिस पाटीमागुन जोराची धडक देवुन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी जयश्री भ्र. विठठल येडके, वय 52 वर्षे, व्यवसाय विटभटटी कामगार रा. खडक मांजरी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 646/2022 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हंबर्डे, मो.क्र. 9823040224** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :–

**लिंबगाव :–**दिनांक 30.10.2022 रोजी 18.00 वा.चे सुमारास, **लिंबगाव ते पुर्णाकडे जाणाऱ्या रोडवर नाळेश्वर फाटा येथे मौ. लिंबगाव शिवार ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार हे अवैध धंद्याची माहिती काढुन केसेस करणे कामी पेट्रोलींग करीत असताना त्यांना नाळेश्वर फाटा येथे अपघात झाल्याची माहिती मिळाल्याने अपघातस्थळी जावुन अपघातातील पिडीतांना सविस्तर मार्गदर्शन करून पोस्टेला जावुन तक्रार देण्यास सांगीतले व तेथे रोडवर जमलेल्या लोकांना रोडचे बाजुला जाण्यास कळवुन रहदारी सुरळीत करीत असतांना यातील नमुद आरोपीने त्यांची मो सा क्रं एमएच–22/एवाय–9788 शाहीन कंपणीची ही रोड मध्ये लावुन फोटो काढीत असतांना फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यास मो सा काढुन बाजुस घेण्यास सांगीतले असता आरोपीने त्यांचे सोबत आरेरावीची भाषा वापरून मोठमोठयाने आरडा ओरडा करून दहशत निर्माण केली फिर्यादी व साक्षीदारांना धक्काबुक्की करून साक्षीदाराचे गळयास धरून दुखापत केली व थपडा बुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली व तुमच्या सर्वाच्या नौकऱ्या घालतो असे म्हणुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी पोकॉ/861 यादव माधव सोनकांबळे, ने. पोस्टे लिंबागाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 157/2022 कलम 353, 332, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/जहागीरदार, मो.क्र. 9822337382** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)माळाकोळी :–** दिनांक 30.10.2022 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **माळाकोळी ते कंधार जाणारे रोड लगत हॉटेलचे पाठीमागे आरोपीचे रूममध्ये माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 17,600/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री माणिक आबासो डोके, ने. पोस्टे माळाकोळी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 108/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2308 राठोड, मो.क्रं. 9011079556** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 30.10.2022 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **सार्वजनिक रोडवर भाजीमंढी इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1540/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/664, मोहन उत्तमराव हाके, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 298/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/925 कोंडेकर, मो.क्रं. 02462–236510** हे करीत आहेत.

## 7)गळफास घेवुन मृत्यु :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 25.10.2022 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **मौ. बळीरामपुर ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे गजेंद्र भारत झुंजारे, वय 35 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. बळीरामपुर ता. जि. नांदेड,** यांनी उच्च शिक्षण घेवुन नौकरी मिळत नसल्याने त्या तणावातुन स्वताचे राहाते घरी स्लॅबचे कडीला ओढणीने बांधुन गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार भारत नागोराव झुंजारे, वय 61 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत सपोउपनि रा. बळीरामपुर ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. **125**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.नं. 9823827173** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 418/2022 दिनांक : 31.10.2022

**नांदेड पोलीस दलातर्फे "सरदार वल्लभभाई पाटील "यांचे जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन...**

शासन परिपत्रकान्वये 31 ऑक्टोबर, 2022 **"सरदार वल्लभभाई पटेल"** यांची जयंती निमित्ताने नांदेड पोलीस दलातर्फे विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या निमित्ताने एकता धाव (Unity Run) चे आयोजन करण्यात आले.

सदर एकता धावची सुरूवात सकाळी 07.30 वा. महात्मा गांधी यांचे पुतळयास **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना **राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ** देवुन हिरवी झेंडी दाखवुन सुरूवात करण्यात आली. सदर धाव ही गांधी पुतळा, महाविर चौक, गुरूद्वारा चौक, जुना मोंढा टावर येथील **सरदार वल्लभभाई पटेल** यांचे पुतळयास पुष्पहार घालुन अभिवादन करून समारोप करण्यात आला. तसेच शहरातील व ग्रामीण भागातील सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांच्या नेत्रत्वाखाली विवीध सामाजीक संस्था, शालेय विद्यार्थी, नागरीक, यांचे सहभागातुन विवीध ठिकाणी एकता धावचे आयोजन करण्यात आले होते.

सदर एकता धाव **मा. श्री निसार तांबोळी,** पोलीस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री निलेश मोरे**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप,** पोलीस उप अधिक्षक(मु.) नांदेड **मा. श्री. चंद्रशेन देशमुख**, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, **मा. श्री. जगदीश भंडरवार**, पोनि पोस्टे वजिराबाद, **मा. श्री. विजय धोंडगे**, रापोनि पो.मु. नांदेड, **मा. श्री. शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, शहरातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदर एकता धाव मध्ये सहभाग घेतला.

शासन परिपत्रकान्वये 31 ऑक्टोबर, 2022 ते 06 नोव्हेंबर, 2022 या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन व भ्रष्टाचार मुक्त भारत–विकसीत भारत साजरा केला जाणारा असुन त्या अनुषंगाने आज रोजी **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयातील अधिकारी व अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी यांना भ्रष्टाचार निर्मुलना बाबत शपथ दिली. तसेच जिल्हयातील व ग्रामीण भागातील सर्व पोस्टे येथील प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिनिस्त अधिकारी व अंमलदार यांना शपथ देण्यात आली. तसेच **सरदार वल्लभभाई पटेल** यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन अभिवादन केले. तसेच **स्व. श्रीमती इंदिरा गांधी** यांची आज रोजी पुण्यतिथी निमित्ताने यांचे प्रतिमेस पुष्पहार घालुन अभिवादन केले आहे. सदर कार्यक्रमास **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री निलेश मोरे**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री. विजय कबाडे**, अपर पोलीस अधिक्षक भोकर, **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप,** पोलीस उप अधिक्षक(मु.) नांदेड, **श्री कुसे**, पोलीस निरीक्षक नियंत्रण कक्ष, **शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच मंत्रालयीन कर्मचारी उपस्थितीत होते.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


निंदा स्तुती कोणी न करा कोणाची ।
नाही या देहाची शुद्धी कोणा ।।




कन्हैयालाल कॉम्प्लेक्स


CK BIRLA GROUP
Birla-A1
StrongCrete
The Forever Cement
ORIENT
NANDED


TITAN
SILVER
SHOE